नवजात बालकांमध्ये के जीवनसत्त्वाचे महत्त्व काय?

आरोग्य वार्ता

नवी दिल्ली : नवजात बालकांच्या शरीरात 'के' जीवनसत्त्व पुरेशा प्रमाणात नसते. रक्त गोठण्यासाठी हे आवश्यक आहे. म्हणूनच जगातील बहुतांश देशांत जन्मानंतर सर्व नवजातांना 'के' जीवनसत्त्वाचे इंजेक्शन दिले जाते. हे इंजेक्शन न दिल्यास त्यांना 'के' जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे होणाऱ्या रक्तस्त्रावाचा धोका असतो. ही दुर्मीळ, जीवघेणी स्थिती असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

शरीरात के जीवनसत्त्वाचे प्रमाण कमी असल्यास बाळाला 'व्हिटॅमिन के डेफिशियन्सी ब्लीडिंग' हा गंभीर आजार होऊ शकतो. शिवाय बाळाच्या मेंदूत किंवा पोटात धोकादायक अंतर्गत रक्तस्त्राव होण्याचा धोका असतो. यकृतावर परिणाम होऊन बाळाच्या के जीवनसत्त्वाचे शोषण बिघडते. के जीवनसत्त्व ही लस किंवा औषध नसून, ते आवश्यक पौषकतत्त्व आहे.

गर्भधारणेदरम्यान गर्भनाळेतून फारच कमी के जीवनसत्त्व बाळापर्यंत पोहोचते. नवजातांच्या आतड्यात के जीवनसत्त्व तयार करणारे जिवाणू व्यवस्थित तयार झालेले नसतात. मानवी दुधातही त्याचे प्रमाण कमी असते. निरोगी नवजातांसाठी जन्माच्या वेळी एक मिलिग्राम इंजेक्शन सहसा मांडीच्या स्नायूतून दिले जाते.

के जीवनसत्त्वाचे इंजेक्शन न घेतलेल्या नवजातांची संख्या वाढत असल्याचे अमेरिका आणि स्वीडनमधील दोन मोठ्या अभ्यासांमध्ये समोर आले आहे. भारत सरकारच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, सरकारी आणि खासगी दोन्ही रुग्णालयांमध्ये बाळाच्या जन्मानंतर पहिल्या काही तासांतच हे इंजेक्शन देणे अनिवार्य आहे.

राष्ट्रसंत आनंदऋषी रुग्णालयात दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया शिबिर

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : राष्ट्रसंत आनंदऋषी रुग्णालयाच्या मोफत आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांची सेवा घडत आहे. रुग्णसेवेचे कार्यही दिवसेंदिवस वाढत आहे. हे रुग्णालय मानवसेवेतून निर्माण झालेले आरोग्य मंदिर आहे, असे मत उद्योजक अशोक भंडारी यांनी केले.

आनंदऋषी महाराजांच्या १२६ व्या जन्मदिनानिमित्त दुर्बिणीद्वारे बिनटाका शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन धनलक्ष्मी ट्रेडिंग कंपनी व भंडारी परिवाराच्या माध्यमातून करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन उद्योजक अशोक भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. सविता भंडारी, पराग भंडारी, निकिता भंडारी, राजेश भंडारी, नयना भंडारी, सोहन गुगळे, प्रेषिका भंडारी,

मानविक भंडारी आदींसह 'जैन सोशल फेडरेशन'चे डॉ. वसंत कटारिया, सतीश लोढा, सुभाष मुनोत, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, वसंत चोपडा, डॉ. भास्कर जाधव, डॉ. रवींद्र मुथा, डॉ. महेश घुगे आदी उपस्थित होते. शिबिरात ११० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

निकिता भंडारी म्हणाल्या, जैन सोशल फेडरेशनने शिबिराच्या माध्यमातून सेवेत सहभागी होण्याची संधी दिल्याबद्दल भंडारी परिवार ऋणी आहे. उद्योजक राजेश भंडारी म्हणाले, धावपळीमुळे प्रत्येकाला आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागते. आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गरजू समाजाची सेवा घडते. आरोग्य सेवेच्या कार्यात जैन सोशल फेडरेशन सदस्यांचे मोठे योगदान आहे.

प्रास्ताविक डॉ. वसंत कटारिया यांनी केले. डॉ. महेश घुगे म्हणाले, आतडे, फुफ्फुसे व कर्करोगासारख्या आजारांवरील शस्त्रक्रिया दुर्बिणद्वारे केल्या जात आहेत. या शिबिराचा रुग्णांनी लाभ घ्यावा. सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी तर आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.

सरकारी कर्मचाऱ्यांची जोरदार निदर्शने

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या वतीने आज, मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ 'चेतना दिन' व 'मागणी दिन' एकजुटीने साजरा केला. विविध मागण्यांसाठी सरकारी कर्मचाऱ्यांनी जोरदार निदर्शने केली.

आंदोलनात संघटनेचे सरचिटणीस रावसाहेब निमसे, अध्यक्ष सुभाष तळेकर, उपाध्यक्ष अशोक मासाळ, विजय काकडे, भाऊ शिंदे, सुनील आहेर, सहचिटणीस संदिपान कासार, पुरुषोत्तम आडेप, सागर गायकवाड, मुकुंद शिंदे, मंजुषा बागडे, सी.पी. नोडके, सोनाली वडणे, मनीषा ओहोळ, एस.एम. वैद्य, लता गायकवाड, भाऊसाहेब डमाळे, वासुदेव राक्षे, अमीन इनामदार, विश्वेश्वर खेडेकर, दीपक चन्ने, वृषाली करोसिया, सुरेश जेढे, अमर शिंदे, सौरव बोठे, रेणुका येंबारे आदी सहभागी झाले होते.

नगरच्या घटनेचे कर्जतमध्ये पडसाद; शिवसैनिकांची निदर्शने

लोकसत्ता वार्ताहर

कर्जत : अहिल्यानगर शहरातील मुकुंदनगर भागात हल्ल्यात तरुणाचा मृत्यू झाल्याच्या घटनेचे तीव्र पडसाद कर्जत शहरात उमटले. या घटनेचा निषेध करत शिवसेना (शिंदे गट) तालुकाप्रमुख डॉ. नितीन तोरडमल यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी कर्जत पोलीस ठाण्यासमोर घोषणाबाजी केली. संबंधित आरोपींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशा मागणीचे निवेदन पोलीस निरीक्षक हनुमान गायकवाड यांना देण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ नेते शिवाजीराव फाळके, प्रसाद कानगुडे, चंदनसिंग परदेशी, राहुल धोदाड, सुदाम गदादे, उपदेश कातेकर, हर्षद परदेशी, सावता अनारसे, जवानसिंग परदेशी, अजिंक्य परदेशी तसेच करणी सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते. घटनेचा निषेध करत डॉ. तोरडमल म्हणाले, आरोपींची मालमत्ता बुलडोझर लावून पाडून टाकावी अन्यथा शिवसैनिक रस्त्यावर उतरतील. या प्रकरणाचा तपास जलदगतीने पूर्ण करून दोषींवर कठोर शिक्षा व्हावी, खटला जलदगती न्यायालयात चालवावा.

शिवाजीराव फाळके म्हणाले, प्रशासनाने दोषींना पाठीशी घालू नये, कायद्याच्या चौकटीत कठोर कारवाई करावी. या घटनेमुळे संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

राहुरी महाविद्यालयासाठी एसटी बस थांबा द्या

आमदार प्राजक्त तनपुरे यांची महामंडळाला सूचना

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : राहुरीतील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी परिवहन महामंडळाने एसटी बसला थांबा द्यावा, बस न थांबवणाऱ्या वाहक व चालकांवर रीतसर कारवाई करावी, अशा स्पष्ट सूचना आमदार प्राजक्त तनपुरे यांनी शनिवारी एसटी महामंडळाला दिल्या.

राहुरीतील छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या स्व. रामदास पाटील धुमाळ कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय येथे अहिल्यानगर विभागाच्या एसटी गाड्यांचा अधिकृत बसथांबा असल्याने तेथे बस थांबणे अपेक्षित

आहे. मात्र, एसटी बस थांबत नसल्यामुळे विद्यार्थी, शिक्षक व प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागतो. तसेच, राहुरी बसस्थानकातून काही वाहकांकडून राहुरी महाविद्यालयापर्यंत प्रवाशांना बसमध्ये घेण्यास नकार दिला जात असल्याच्या तक्रारीही आमदार तनपुरे यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर राहुरी महाविद्यालयात आज संबंधित अधिकारी, महाविद्यालय प्रशासन आणि विद्यार्थी प्रतिनिधींची बैठक आमदार तनपुरे यांच्या उपस्थितीत घेण्यात आली. त्या वेळी त्यांनी वरील सूचना केल्या. विद्यार्थ्यांची गैरसोय तातडीने दूर करून महाविद्यालयाच्या ठिकाणी सर्व बसना नियमित थांबा देण्याबाबत, तसेच अधिकृत बसथांबा असा फलक तेथे लावण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

नियमित थांबा असतानाही बस न थांबविणाऱ्या चालक-वाहकांवर योग्य ती कारवाई करावी, तसेच विद्यार्थी व प्रवाशांना सुरळीत बससेवा मिळावी, यासाठी ठोस कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. विद्यार्थ्यांच्या आणि प्रवाशांच्या सोईशी तडजोड खपवून घेतली जाणार नसल्याचा इशारा तनपुरे यांनी दिला. या वेळी तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे संचालक व शिक्षण मंडळाचे सचिव हर्ष तनपुरे, प्राचार्य नवनाथ दळवी उपस्थित होते.

निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी सर्वेक्षण

जिल्हा परिषदेचा निर्णय; ग्रामपंचायतींचा सहभाग

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : राज्य सरकारच्या निर्णयानुसार १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वीची निवासी प्रयोजनासाठी शासकीय जागेवर झालेली अतिक्रमणे नियमित करण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत सर्वेक्षण करण्याचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी घेतला आहे. ग्रामपंचायतींमार्फत हे सर्वेक्षण केले जाणार आहे.

जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ यांनी ही माहिती दिली. केवळ निवासी प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणे नियमित केले जाणार आहेत. कोणती अतिक्रमणे नियमित केली जाणार, त्याच्या पात्रता तसेच अटी व निकष राज्य सरकारने जाहीर केले आहेत.

५०० चौरस फुटांपर्यंत विनामूल्य नियमित

ग्रामीण व शहरी भागासाठी १५०० चौ. फुटापर्यंतचे क्षेत्र नियमित करता येणार आहे. ५०० चौ. फूट क्षेत्रापर्यंत सर्व निवासी अतिक्रमणे विनामूल्य नियमानुकुल होतील, त्यापेक्षा अधिक क्षेत्रासाठी संबंधित जागेच्या बाजारमूल्यानुसार येणाऱ्या किमतीच्या १० टक्के रक्कम तसेच निवासी जागेचा काही भाग व्यावसायिक असल्यास प्रचलित बाजार मूल्याच्या २५ टक्के रक्कम आकारली जाणार आहे. पंधराशे चौक फुटापेक्षा अधिक अतिक्रमण असल्यास अधिकचे क्षेत्र निष्कासित केले जाणार आहे. अतिक्रमण नियमानकुल करण्यासाठी अर्ज दाखल करण्याची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत असेल.

अपात्र अर्जदारांची अतिक्रमणे हटवणार

अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी महापालिका व अ वर्ग नगरपालिका क्षेत्रासाठी जिल्हाधिकारी तर 'क' व 'ब' वर्ग नगरपालिका-नगरपंचायतसाठी उपविभागीय अधिकारी व ग्रामीण भागासाठी तहसीलदारांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत तसेच त्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. अपात्र ठरणाऱ्या अर्जदारांना तीस दिवसांत अतिक्रमण काढून घेण्याची नोटीस बजावली जाणार आहे.

अतिक्रमण असल्याच्या पुराव्यासाठी संबंधित वार्ड-प्रभाग मतदार यादीत नाव असावे, वीज बिल, मालमत्ता कराची पावती किंवा निवासी पुराव्यासाठीचे इतर शासकीय दस्तऐवज (शिधापत्रिका वगळून) जसे ग्रामपंचायतमधील उतारा, अतिक्रमण सर्वेक्षण नोंदवही, झोपडपट्टी घोषणेची अधिसूचना, उपग्रह छायाचित्र ग्राह्य धरले जाईल. मात्र, हे सर्व पुरावे गेल्या एक वर्षातील हवे आहेत.

व्यावसायिक वापराची अतिक्रमणे नियमित करण्यासाठी पात्र ठरणार नाहीत. गायरान जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकुल न करता त्या अतिक्रमणधारकांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत निवास उपलब्ध करण्यासाठी सदर जमीन ही वैयक्तिक लाभार्थ्यांऐवजी संबंधित स्थानिक नियोजन प्राधिकरण-स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध केली जाणार आहे.

एका कुटुंबासाठी महाराष्ट्रात एकाच ठिकाणी अतिक्रमण नियमित करून घेता येईल, असे नियमानकुल केलेले क्षेत्र हस्तांतरण, त्याची विक्री किंवा भाड्याने देता येणार नाही, वापरात बदल करता येणार नाही. अतिक्रमण केलेली जागा सार्वजनिक प्राधिकरणाच्या (उदा. रेल्वे, महामार्ग, विद्युत वाहिन्या) जवळ असल्यास संबंधित विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील.

नगरदेवळे ग्रामपंचायतीच्या कारवाईला उच्च न्यायालयाची तूर्त स्थगिती

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : शहरातील मुकुंदनगर भागात घडलेल्या धीरज परदेशी खून प्रकरणात आरोपी राहत असलेल्या मिळकत क्रमांक २५१७ मधील घराच्या बांधकामावर नगरदेवळे ग्रामपंचायतकडून प्रस्तावित कारवाईच्या नोटिशीला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने आज, मंगळवारी अंतरिम स्थगिती दिली आहे. पुढील सुनावणी आठ सप्टेंबरला ठेवली आहे.

याचिकाकर्ते याकूबमिया मिरतपटेल सय्यद यांच्या वतीने ॲड. अनघा पेडगावकर यांनी ही याचिका दाखल केली होती. त्यावर पुढील आदेश येईपर्यंत याचिकाकर्त्याच्या संबंधित मिळकतीवर पाडकामासारखी कोणतीही सक्तीची कारवाई करू नये, असे आदेश न्यायालयाने दिल्याचे ॲड. पेडगावकर यांनी सांगितले.

नगरदेवळे ग्रामपंचायतीने ७ ऑगस्टला संबंधित मिळकतधारकाला नोटीस बजावली होती. यात अनाधिकृत बांधकाम, अतिक्रमण झाल्याचे नमूद करून महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम ५३ अन्वये बांधकाम काढून टाकण्याची कारवाई करण्याचा इशारा दिला होता. या प्रस्तावित कारवाईविरोधात सय्यद यांनी उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली.

संबंधित इमारतीच्या बांधकामाच्या आवश्यक परवानग्या उपलब्ध असून, ग्रामपंचायतीचा कर नियमितपणे भरत असून, आवश्यक परवानग्या प्रशासनाकडे सादर केलेल्या असतानाही, मंगळवारी सकाळी जेसीबी मशीनच्या साहाय्याने कथित अतिक्रमण काढण्यासाठी प्रशासनाकडून कार्यवाही सुरू करण्यात आली होती, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयात केला.

न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी आणि न्यायमूर्ती आबासाहेब शिंदे यांच्या खंडपीठाने पुढील आदेश येईपर्यंत याचिकाकर्त्याच्या संबंधित मिळकतीवर पाडकामासारखी कोणतीही सक्तीची कारवाई करू नये, असे आदेश देत पुढील सुनावणी ८ सप्टेंबरला ठेवली आहे.

भाजपचे 'हर घर तिरंगा' अभियान

लोकसत्ता वार्ताहर

राहाता : स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर येथे भाजपच्या वतीने आज (बुधवारी) 'तिरंगा फेरी'चे आयोजन केले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातून हजारो कार्यकर्ते या फेरीत सहभागी होणार आहेत. रॅलीच्या यशस्वीतेसाठी पक्षाच्या बूथवरील प्रत्येक कार्यकर्त्याने नियोजन करावे. प्रत्येक मंडलामध्ये 'हर घर तिरंगा' अभियान राबवून नागरिकांना सहभागी करून घेण्याचे आवाहन पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी केले.

पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत नुकतेच बैठकीचे आयोजन केले होते. त्यावेळी मंत्री विखे बोलत होते. जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, ज्येष्ठ नेते सीताराम भांगरे, सभापती ज्ञानेश्वर गोंदकर, अशोक पवार, रोहित चौधरी, रऊफ शेख तसेच तालुकाध्यक्ष, आघाड्यांचे प्रमुख उपस्थित होते. महारॅलीपूर्वी प्रत्येक मंडलामध्ये तिरंगा फेरीचे आयोजन करण्याचे आवाहन मंत्री विखे यांनी केले.

शिर्डीतील गुन्हेगार अनिकेत शेजवळ स्थानबद्ध

लोकसत्ता वार्ताहर

राहाता : शिर्डीत दहशत निर्माण करणारा सराईत गुन्हेगार अनिकेत उर्फ झिंग्या सुनील शेजवळ (वय २८, भीमनगर, शिर्डी) याला एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध करून त्याची रवानगी नाशिक मध्यवर्ती कारागृहात करण्यात आल्याची माहिती शिर्डीचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना दिली.

शेजवळ यांच्याविरुद्ध शिर्डी पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत करणे, अपहरण करून खुनाचा प्रयत्न करणे, जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करणे, अश्लील कृत्य करणे आदी गुन्हे दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांना प्रतिबंध होण्यासाठी शिर्डीचे पोलीस निरीक्षक रणजित गलांडे यांनी एमपीडीए कायद्यान्वये कारवाईचा प्रस्ताव उपविभागीय अधिकारी भारती यांच्यामार्फत अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्याकडे दाखल केला होता. त्याची पडताळणी करून प्रस्ताव जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना सादर केला. त्यांनी सराईत गुन्हेगार अनिकेतला स्थानबद्ध करण्याचे आदेश काढले होते. दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार, वाळू तस्कर आणि संघटित गुन्हेगारी टोळ्यांविरुद्ध यापुढेही अशीच कठोर कारवाई सुरू राहणार आहे. अशा टोळीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येत असून त्यांच्यावर प्रचलित कायद्यान्वये कठोर कारवाई करण्यात येईल, असे अमोल भारती यांनी सांगितले.

VASANTDADA PATIL PRATISHTHAN'S LAW COLLEGE
Vasantdada Patil Educational Complex, Eastern Express Highway, Padmabhushan Vasantdada Patil Marg, Sion Mumbai 400022.
UNAIDED
Applications are invited for the following Teaching Posts from the Academic year 2026-27

Sr. No.	Cadre	Subject	Total No. of Posts	Posts Reserved for
1.	Principal	--	01	01- Open
2.	Assistant Professor	Law	08	01 - SC, 01-ST, 01 - DT (A), 01 - OBC, 01 - SEBC, 01 - EWS, 02 - Open. Horizontal Reservation - Women - 01 Post (Open - 01)
3.	Librarian	--	01	01 - Open

The posts for the reserved category candidates will be filled in by the same category candidates (Domicile of State of Maharashtra) belonging to that particular category only.
Reservation for women will be as per **University Circular No. BCC/16/74/1998 dated 10th March, 1998. 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special Cell/ICC/2019-20/05 dated 05th July, 2019.**
Candidates having knowledge of Marathi will be preferred.
"Qualification, Pay Scales and other requirement are as prescribed by the UGC Notification dated 18th July, 2018 Government of Maharashtra Resolution No. Misc - 2018 / C.R.56 / 18 / UNI-1, dated 8th March, 2019 and University circular No. TAAS / (CT) / ICD / 2018-19 / 1241, dated 26th March, 2019 and revised from time to time" The Government Resolution & Circular are available on the website mu.ac.in
Applicants who are already employed must send their application through proper channel. Applicants are required to account for breaks, if any in their academic career.
Application with full details should reach the **GENERAL SECRETARY, Vasantdada Patil Pratishthan's LAW COLLEGE, Vasantdada Patil Educational Complex, Eastern Express Highway, Padmabhushan Vasantdada Patil Marg, Sion, Mumbai - 400022,** within 15 days from the date of publication of this advertisement. **Sd/-**
This is University approved advertisement. **GENERAL SECRETARY**

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat
परिशिष्ट -IV-A - अचल मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना
सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.
नोंदणीकृत कार्यालय: 9वा मजला, अंतरिक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली-110001, फोन्स: 011-23357171, 23357172, 23705414, वेब.: www.pnbhousing.com
अहमदनगर : युनिट क्र. 203, दुसरा मजला, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, पंचशिल हॉटेल जवळ, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र - 414003.
याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भाग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्ता मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी रचनात्मक / प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ इ सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची "जशी आहे जेथे आहे" आणि "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे" तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल. याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम इ 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तीच्या तपशीलासाठी कृपया मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.

कर्ज क्र., कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार / कायदेशीर वारस यांचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	तारण मालमत्तेचे वर्णन (डी)	आरक्षित किंमत (आ. कि.) (ई)	बयाणा रक्कम (आ. कि. च्या 10%) (एफ)	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीचा दिनांक व वेळ (आय)	लिलावाचा दिनांक व वेळ (जे)	असल्यास, ज्ञात बोजे/न्यायालयीन कज्जे (के)
HOU/AHMD/0622/997676, गौरव एकनाथ चारभरे / निर्मला एकनाथ चारभरे, शाखा : अहमदनगर	रु. 23,45,232.41 आणि 13-12-2024	प्रत्यक्ष ताबा	स. क्र. 61/2ई, प्लॉट क्र. 51 ते 55/9 पी, उत्तर बाजू, रो ब्लॉक क्र. बी, मोरिया पार्क, पारस कंपनीमागे, बोल्हेगाव, अहमदनगर, महाराष्ट्र, 414111, भारत.	रु. 20,85,000	रु. 2,08,500	27/08/2026	रु. 10,000	18-08-2026 रोजी दु. 12:00 ते दु. 04:00	29-08-2026 रोजी दु.02:00 ते दुपारी 03:00	ज्ञात नाही

*सोबत भरण्याच्या व / वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार / बोलीदारांनी विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी. (1) आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही आणि स्थितीचा उल्लेख स्तंभ क्र.- के मध्ये केला आहे. (2) संभाव्य खरेदीदारांनी / बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ - के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया / आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथेपर्यंत मर्यादित नसून त्यांनी निविदा / बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तीवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. (3) कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार / खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल अन्यथा अशा ठेवी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त करेल आणि मालमत्ता / अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. (4) सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकाऱ्यांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003, वेबसाइट - www.bankeauctions.com, मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत व्यक्ती - गणेश अंकुश / निलाक्षी पाटील, टोल फ्री क्र. : 1800 120 8800, ई-मेल : auction@pnbhousing.com, यांचेशी संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.
ठिकाण :- अहमदनगर, दिनांक :- 12.08.2026 स्वा./- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

बारामती नगरपरिषद शिक्षण विभाग, बारामती
पवित्र पोर्टल भरती सन २०२६ करीता जाहिरात

अ. नं.	संवर्ग	महिला	माजी सैनिक	अंशकालीन	प्रकल्पग्रस्त	भूकंपग्रस्त	खेळाडू	समांतर आरक्षणा व्यतिरिक्त (उर्वरित) पदे	जाहिरातीसाठी रिक्त जागा (एकूण)
१	अ. जा	२	०	०	०	०	०	४	६
२	अ.ज	१	०	०	०	०	०	३	४
३	(अ. ज (PESA)	०	०	०	०	०	०	०	०
४	वि. जा. (अ)	०	०	०	०	०	०	१	१
५	भ. ज. (ब)	०	०	०	०	०	०	१	१
६	भ. ज. (क)	०	०	०	०	०	०	०	०
७	भ. ज. (ड)	०	०	०	०	०	०	०	०
८	इ. मा. व	३	०	०	०	०	०	६	९
९	वि. मा. प्र	०	०	०	०	०	०	१	१
१०	इ. डब्ल्यू. एस	२	०	०	०	०	०	४	६
११	एस. ई. बी. सी.	१	०	०	०	०	०	४	५
१२	अराखीव	०	०	०	०	०	०	०	०

दिव्यांग (४%)

अस्थिव्यंग (१%)	कर्णबधिर (१%)	अंध/अल्पदृष्टी (१%)	Intellectual Disability & Multiple Disability (1%) ID	MD	एकूण
०	०	०	0	0	०

अनाथ (१%)

		अनाथ संस्थामक			अनाथ संस्थ				एकूण ०
१३	एकूण	९	०	०	०	०	०	२४	३३

बारामती नगरपरिषद शिक्षण विभाग, बारामती
शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील

अ.क्र.	माध्यम	पद	वेतनश्रेणी / मानधन	अनुदान प्रकार	विषय	शिकविण्याचे माध्यम	आवश्यक शैक्षणिक पात्रता	आवश्यक व्यावसायिक पात्रता	TET/CTET	एकूण पदे
1	Marathi	Under Graduate Teacher Std (1-4/5)	Consolidated Pay GT (16000)	Aided	All Subjects	Marathi	HSC (Std.12th)	Diploma	TET Paper 1/ CTET Paper 1	26
2	Marathi	Graduate Teacher Std (6-8)	Consolidated Pay UGT (16000)	Aided	Science	Marathi	Graduate	Diploma/ Graduation	TET Paper 2 (Maths- Science) /CTET Paper 2 (Maths-Science)	7
					Total					33

वरील प्रमाणे शिक्षकांची जाहिरात http://tait2025mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर पवित्र प्रणालीमध्ये उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना उपलब्ध आहेत.

सही/-
(जाई पवार)
प्रशासन अधिकारी
शिक्षण विभाग, बारामती नगरपरिषद

सही/-
(पंकज अनिल भुसे)
मुख्याधिकारी गट-अ
बारामती नगरपरिषद, बारामती